Shanti Education Society's
**A. G. Patil Polytechnic Institute, Solapur**
NBA ACCREDITED PROGRAMS
(Approved by AICTE, New Delhi; Recognized by Govt. of Maharashtra; Affiliated to MSBTE, Mumbai)
ISO 9001:2015 CERTIFIED DTE Inst. Code : D6443 MSBTE Inst. Code : 0995

18(2/2A)2, Pratap Nagar, Opp. S.R.P. Camp, Vijapur Road, Solapur- 413008 (Maharashtra, India)
Ph.No.: 0217-2341899 E-mail: agppi.contact@gmail.com Web: www.agppi.edu.in

AGPPI/Admin./Internal/2023-24/271 Date: 29.06.2024

## उन्हाळी-२०२४ परीक्षा
## शीघ्र गुणपडताळणी / फोटोकॉपी (अंतिम सत्र व वर्षाच्या विद्यार्थ्यांकरीता)
## आणि
## सर्वसाधारण गुणपडताळणी / फोटोकॉपी
## (अंतिम सत्र व वर्ष वगळून इतर विद्यार्थ्यांकरीता) बाबत....

संदर्भ : डी-४० / शिघ्र / सर्व साधारण गुणपडताळणी / २०२४ / २३८, दि. २९.०६.२०२४.

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्याद्वारे घेण्यात आलेल्या उन्हाळी-२०२४ परीक्षेचा निकाल शनिवार, दि. २९.०६.२०२४ रोजी मंडळाने जाहिर केले असून सदर निकाल मंडळाच्या www.msbte.org.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

सबब, **उन्हाळी-२०२४ परीक्षेकरीता मंडळाने शीघ्र गुणपडताळणी / फोटोकॉपी (अंतिम सत्र व वर्षाच्या विद्यार्थ्यांकरीता) आणि सर्वसाधारण गुणपडताळणी / फोटोकॉपी (अंतिम सत्र व वर्ष वगळून इतर विद्यार्थ्यांकरीता) तसेच रिअॅसेसमेंट ची सोय दिली असून गुणपडताळणी व फोटोकॉपी करीता ईच्छुक विद्यार्थ्यांनी मंडळाच्या संदर्भिय परिपत्रकातील वेळापत्रकप्रमाणे आणि खाली नमुद आवश्यक फी व कागदपत्रांसह सोमवार, दि. ०१.०७.२०२४ ते बुधवार, दि. ०३.०७.२०२४ या कालावधीत महाविद्यालय कार्यालयात संपर्क साधावे. सदर मुदतीनंतर अर्ज भरता येणार नाही; यामुळे होणाऱ्या शैक्षणिक नुकसानिस विद्यार्थी स्वतः जबाबदारी राहिल, याची सर्वांनी नोंद घ्यावी.**

**आवश्यक कागदपत्रे :**

१. ज्या सत्रातील विषयांचे गुणपडताळणी / फोटोकॉपी करीता ऑनलाईन अर्ज भरावयाचे आहे; त्या सत्राच्या गुणपत्रिकेची मंडळाच्या संकेत स्थळावरील प्रिंट आऊट.

२. गुणपडताळणी / फोटोकॉपी करीता आवश्यक फी :

- गुणपडताळणी (Verification) : Rs. 50/-
- शीघ्र गुणपडताळणी (Urgent Verification): Rs. 100/-
- फोटोकॉपी (Photo Copy) : Rs. 300/-
- पुनर्मूल्यांकन (Re-assessment) : Rs. 400/-

डॉ. एम. ए. चौगुले
प्राचार्य
ए. जी. पाटील पॉलिटेक्निक इन्स्टिटयुट सोलापूर.

सोबत : संदर्भिय परिपत्रक

# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

तक्ता क्रमांक - डी-४०/शिघ्र /सर्वसाधारण गुणपडताळणी/२०२४/ २३८

दिनांक – २९/०६/२०२४

## उन्हाळी परिक्षा – २०२४

## (अ) शिघ्र व सर्वसाधारण गुणपडताळणी / फोटोकॉपी बाबतचे वेळापत्रक –

**(शिघ्र गुणपडताळणी / फोटोकॉपी अंतिम सत्र व वर्षाच्या विद्यार्थ्यांकरीता आणि सर्वसाधारण गुणपडताळणी / फोटोकॉपी अंतिम सत्र / वगळून वर्ष विद्यार्थ्यांकरीता)**

## कालावधी दि. ०१.०७.२०२४ ते १६.०७.२०२४

| अ.क्र. | कार्यवाही | कालावधी व दिनांक |
|---|---|---|
| १ | गुणपडताळणी/फोटोकॉपी करीता विद्यार्थ्यांनी Candidate Login द्वारे अर्ज सादर करण्याचा कालावधी | ०१.०७.२०२४ ते ०३.०७.२०२४ |
| २ | संस्थांनी Institute Login द्वारे विद्यार्थ्यांनी गुणपताळणी/फोटोकॉपीचे सादर केलेल्या अर्जाची छाननी करुन व आवश्यक शुल्क स्विकारुन अर्ज अंतिमत: निश्चित करण्याचा कालावधी | ०१.०७.२०२४ ते ०४.०७.२०२४ |
| ३ | विभागीय कार्यालयांनी RBTE Login द्वारे संस्थांनी निश्चित केलेल्या विद्यार्थ्यांची एकत्रित यादी व आवश्यक शुल्क स्विकारुन अर्ज विभागीय कार्यालयाद्वारे अंतिमत: निश्चित करण्याचा कालावधी. | ०१.०७.२०२४ ते ०५.०७.२०२४ |
| ४ | विभागीय कार्यालयींनी निश्चित केलेल्या विद्यार्थ्यांची माहिती मुख्य कार्यालयाकडे पाठविण्याचा कालावधी | ०५.०७.२०२४ |
| ५ | विभागीय कार्यालयाने निश्चित केलेल्या गुणपडताळणी/ फोटोकॉपी अर्जानुसार संबंधित गुणमुल्यांकन केंद्रांना आणि विभागीय कार्यालयांना माहिती पाठविण्याचा दिनांक | ०६.०७.२०२४ |
| ६ | गुणमुल्यांकन केंद्राने मंडळाच्या निर्देशानुसार मूळ उत्तरपत्रिकांमधील गुणांची पडताळणी करण्याची कार्यवाही व मुळ उत्तरपत्रिकेच्या छायाप्रती काढण्याचा कालावधी | ०६.०७.२०२४ ते ०८.०७.२०२४ |
| ७ | गुणमुल्यांकन केंद्राने कार्यवाही पूर्ण करुन संबंधीत पी सी डी सी (PCDC) कडे खालील प्रमाणे सिलबंद पाकीटे पाठविण्याचा कालावधी<br>(अ) गुणपताळणी/फोटोकॉपी यामध्ये गुणबदल (**Change Case**) झालेल्या प्रकरणांची मूळ उत्तरपत्रिका<br>(ब) फोटोकॉपी मधील गुणात बदल न झालेल्या (**No Change Case**) प्रकरणांची मूळ उत्तरपत्रिका<br>(क) फोटोकॉपीसाठी अर्ज केलेल्या सर्व उत्तरपत्रिकांच्या फोटोकॉपींच्या प्रती<br>(टिप- शिघ्र गुणपडताळणी व साधारण गुणपडताळणी असे वर्गीकरण करुन स्वतंत्र पाकिटे सादर करावी) | ०८.०७.२०२४ ते १०.०७.२०२४ |
| ८ | गुणबदल (Change Case) प्रकरणांची विभागीय कार्यालयाने त्रिसदस्यीय समिती गठीत करुन तपासण्याचा व मंडळाच्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही करण्याचा कालावधी | ११.०७.२०२४ ते १२.०७.२०२४ |
| ९ | पी सी डी सी ने प्राप्त फोटोकॉपी पाकीटे संस्था निहाय वर्गीकरण करुन संबंधित संस्था निहाय त्या विभागातील पी सी डी सी कडे पाठविण्याचा कालावधी | ११.०७.२०२४ ते १३.०७.२०२४ |
| १० | गुणांमधील बदल झालेली प्रकरणे विभागीय कार्यालयाने मुख्य कार्यालयाकडे पाठविण्याचा कालावधी | १५.०७.२०२४ |
| ११ | पी सी डी सी ने फोटोकॉपी उत्तरपत्रिका संबंधीत संस्थेला देण्याचा कालावधी | १४.०७.२०२४ ते १५.०७.२०२४ |
| १२ | संस्थेने आवश्यक नोंद करुन संबंधित विद्यार्थ्यास उत्तरपत्रिका फोटोकॉपी देण्याचा कालावधी | १६.०७.२०२४ |
| १३ | गुणपडताळणी/फोटोकॉपी निकाल **Institute Login** व **RBTE Login** मध्ये जाहिर करण्याचा दिनांक | १६.०७.२०२४ |

**महत्त्वाच्या सूचना –**

अ) संस्थांनी उपरोक्त वेळापत्रक सूचना फलकावर लावून विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावे.

ब) विद्यार्थ्यांनी वेळापत्रकात दिलेल्या कालावधीत अर्ज भरुन संस्थेमार्फत आवश्यक शुल्क भरुन विहित कालावधीत निश्चित करणे आवश्यक आहे.

क) संस्थांनी वेळापत्रकानुसार निश्चित केलेले सर्व अर्ज आवश्यक शुल्क भरुन विभागीय कार्यालयात निश्चित करणे आवश्यक आहे.

ड) विद्यार्थ्यांनी प्राप्त फोटोकॉपी मधील गुणांमधले बदल असल्यास संबंधित संस्थेच्या प्राचार्यांमार्फत संबंधित विभागीय कार्यालयाकडूनच सदर प्रकरणाचा पाठपुरावा करून गुणबदल करणे आवश्यक आहे.

## ब) पुनर्मूल्यांकन (Re-assessment) बाबतचे वेळापत्रक

## कालावधी – (१७.०७.२०२४ ते १२.०८.२०२४)

| अ.क्र. | कार्यवाही | शिघ्र पुनर्मूल्यांकनाचा कालावधी/दिनांक (फक्त अंतिम वर्ष/सत्र विद्यार्थ्यांकरीता) | साधारण पुनर्मूल्यांकनाचा कालावधी/दिनांक |
|---|---|---|---|
| १४ | **विद्यार्थ्याने फोटोकॉपीनिहाय विषयांच्या पुनर्मूल्यांकनाकरीता** Candidate Login **द्वारे अर्ज सादर करावयाचा कालावधी** | **१७.०७.२०२४ ते १८.०७.२०२४** | **१७.०७.२०२४ ते १८.०७.२०२४** |
| १५ | **संस्थांनी** Institute Login **द्वारे विद्यार्थ्यांनी पुनर्मूल्यांकनाच्या सादर केलेल्या अर्जाची छाननी करुन व आवश्यक शुल्क स्विकारुन अर्ज कन्फर्म करण्याचा कालावधी** | **१७.०७.२०२४ ते १९.०७.२०२४** | **१७.०७.२०२४ ते १९.०७.२०२४** |
| १६ | **विभागीय कार्यालयाने** RBTE Login **द्वारे संस्थांनी कन्फर्म केलेल्या विद्यार्थ्यांची एकत्रित यादी व आवश्यक शुल्क स्विकारुन अर्ज अंतिमत: कन्फर्म करण्याचा कालावधी** | **१९.०७.२०२४ ते २२.०७.२०२४** | **१९.०७.२०२४ ते २२.०७.२०२४** |
| १७ | विभागीय कार्यालयाकडून मुख्य कार्यालयाकडे data uploading | **२२.०७.२०२४** | **२२.०७.२०२४** |
| १८ | मुख्य कार्यालयाने सदर माहिती वर्गीकृत करुन संबंधित / पी.सी.डी.सी व **पुनर्गुणमूल्यांकन** केंद्रांकडे पाठविण्याचा दिनांक | **२३.०७.२०२४** | **२३.०७.२०२४** |
| १९ | पी सी डी सी ने **पुनर्मूल्यांकनासाठी** अर्ज केलेल्या मूळ उत्तरपत्रिका संबंधित आर.आर. ए. सी. कडे पाठविणे | **२३.०७.२०२४ ते २४.०७.२०२४** | **२३.०७.२०२४ ते २४.०७.२०२४** |
| २० | आर आर ए सी ने करावयाच्या **पुनर्मूल्यांकना**च्या कार्यवाहीचा कालावधी | **२४.०७.२०२४ ते २९.०७.२०२४** | **२४.०७.२०२४ ते ३१.०७.२०२४** |
| २१ | आर आर अे सी मध्ये केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने त्रिसदस्यीय समितीने करावयाची छाननी व त्या अनुषंगाने निर्गमित करावयाच्या आदेशांचा कालावधी | **२७.०७.२०२४ ते ३०.०७.२०२४** | **२८.०७.२०२४ ते ०१.०८.२०२४** |
| २२ | विभागीय कार्यालयांनी मुख्य कार्यालयाकडे **पुनर्मूल्यांकनाचा** अहवाल ऑन लाईन पध्दतीने सादर करण्याचा कालावधी | **३१.०७.२०२४** | **०२.०८.२०२४** |
| २३ | **पुनर्मूल्यांकनाचा निकाल online जाहीर करण्याचा दिनांक** | **०१.०८.२०२४** | **०५.०८.२०२४** |
| २४ | पुर्नमुल्यांकनामध्ये गुणबदल प्रकरणानुसार निकाल दुरुस्ती करण्याचा कालावधी | **०१.०८.२०२४ ते ०४.०८.२०२४** | **०५.०८.२०२४ ते ०८.०८.२०२४** |
| २५ | निकालदुरुस्तीनंतर सुधारित गुणपत्रिका संबंधित विभागीय कार्यालयाकडे पाठविण्याचा कालावधी | **०५.०८.२०२४** | **०९.०८.२०२४** |
| २६ | संस्थेने सुधारित गुणपत्रिका विद्यार्थ्यांना देण्याचा कालावधी | **०८.०८.२०२४** | **१२.०८.२०२४** |

**महत्त्वाच्या सूचना –**

१) संस्थांनी उपरोक्त वेळापत्रक सूचना फलकावर लावून विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावे.

२) विद्यार्थ्यांनी वेळापत्रकात दिलेल्या कालावधीत अर्ज भरुन संस्थेमार्फत आवश्यक शुल्क भरुन विहित कालावधीत निश्चित करणे आवश्यक आहे.

३) संस्थांनी वेळापत्रकानुसार निश्चित केलेले सर्व अर्ज आवश्यक शुल्क भरुन विभागीय कार्यालयात निश्चित करणे आवश्यक आहे.

४) विद्यार्थ्याने फोटोकॉपीमधील गुणांमध्ये बदल असल्यास अ. क्र. (ड) नुसार कार्यवाही न करता रिअसेसमेंटसाठी अर्ज केल्यास फोटोकॉपीमधील गुणांत बदल ग्राह्य धरला जाणार नाही व रिअसेसमेंट मध्ये मिळालेले गुण अंतिम गुण म्हणून ग्राह्य धरले जातील, हि बाब संबंधित विद्यार्थ्यांना रिअसेसमेंटसाठी अर्ज करण्यापूर्वी प्रकर्षाने जाणीव करून देण्यात यावी.

५) **संस्थेने विद्यार्थ्यांचा पुनर्गुणमुल्यांकनाचा (Reassessment चा) अर्ज निश्चित करण्याआधी विद्यार्थ्यांची उन्हाळी परीक्षा-२०२४ ची मंडळाद्वारे देण्यात आलेली मूळ गुणपत्रिका संस्थेत जमा करणे आवश्यक आहे. त्यानंतरच पुनर्गुणमुल्यांकनाचा अर्ज निश्चित करावा.**

६) **वरीलप्रमाणे जमा केलेल्या सर्व मुळ गुणपत्रिका एका बंद लिफाफ्यामाध्ये संबंधित विभागीय कार्यालयाकडे जमा करून पोहोच घ्यावी. त्याशिवाय विभागीय कार्यालयाकडून अर्ज निश्चित केले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.**

(डॉ. महेंद्र रा. चितलांगे)
सचिव
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,मुंबई – ५१

प्रत-

१. मा. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई - यांना माहितीस्तव सादर

२. उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ विभागीय कार्यालय मुंबई / पुणे / नागपूर / छ. संभाजीनगर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित

3. सहा. सचिव (तां), का. क्र. ४० यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी